# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - निसर्गातले स्वर-रंग
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. सुप्रिया गायकवाड

---

सूर जुळावे साथ जुळावी
श्रावणातल्या जशा सरी
ऊन पाऊस खेळ रंगला
रम्य असा धरतीवरी ||

सप्तसूर सात रंग
नाते अजोड त्यांचे असे
रंग मनोहर सूर साजिरे
बघता गाता भान हरे ||

तालावरती वीज चमकली
तेज पसरले मन शहारलेले
छम छम करीत थेंब नाचती
नृत्य मनोहर मन भावन करती ||

मंद्र-मध्य-अन तार सप्तकी
लहरत वायू हिंदोळ्यावर
आठवणींच्या सरी बरसती
झरझरती मन भिजवती ||

खेळ संपला तालाचा
स्वच्छ निरभ्र आभाळ असे
क्षितिजावर मात्र दूरवर
सप्तरंगी इंद्रधनू दिसे ||

सप्तसूर अन सप्तरंग हे
नाते लोभसवाणे व्हावे
लाल गुलाबी रंगा मधला
राग मारवा मनी आठवे ||

Anahat Music Therapy